‘ प्रेसनोट’

दिनांक : ०८/०४/२०२६

| युनिट | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती |
|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नाव, पद, वर्ग व कार्यालय | श्री.सुशांत हरीदास बावनगडे वय ४५ वर्ष , पद—सहाय्यक अभियंता,महावितरण कार्यालय धारणी वर्ग २,कार्यालय—म.रा.वि.वि.कं.मर्या धारणी<br>रा.श्री.मालवीय यांच्या घरी भाडयाने,संतोषी माता मंदीराजवळ होली चौक धारणी ता.धारणी जि.अमरावती<br>मुळ पत्ता —लेव्हरेज ग्रिनसिटी फ्लॅट नंबर ३०४ कोराडी रोड नागपुर जि.नागपुर |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,०००/— रु. |
| तडजोडी अंती मागणी केलेली लाचेची रक्कम | ४,०००/—रु |
| घटनास्थळ | म.रा.वि.वि.कं.मर्या. कार्यालय,धारणी |
| घटना तारीख व वेळ | दि.०८/०४/२०२६ चे १६.४१ वा. ते १६.४९ वा. द |

**थोडक्यात हकीकत** :— दिनांक ०८/०४/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की,तक्रारदार हे सोलर पॅनल बसविण्याचा व्यवसाय करतात.सोलर पॅनल बसविल्यानंतर ग्राहकाच्या वतीने एम.एस.ई.बी.कार्यालय येथुन सोलर मिटर रिलीज ऑर्डर काढण्याकरीता ते स्वत: पाठपुरवठा करतात.तक्रारदार यांनी मार्च महीन्यामध्ये एकुण ४ ग्राहकांच्या घरी सोलर पॅनल बसविले असुन दिनांक २६/०३/२०२६ रोजी एक ,दिनांक २७/०३/२०२६ रोजी ०२ व दिनांक ३१/०३/२०२६ रोजी ०१ असे एकुण चार ग्राहकांसोबत करार केला आहे त्या चारही ग्राहकांचे सोलर मिटर रिलीज ऑर्डर काढण्याकरीता तक्रारदार यांनी म.रा.वि.वि.कं मर्या धारणी येथे अर्ज केला आहे.

दि.०७/०४/२०२६ रोजी म.रा.वि.वि.कं.मर्या धारणी येथे तक्रारदार हे ग्राहकांच्या सोलर मिटर रिलीज ऑर्डर काढण्याकरीता विचारपुस करण्याकरीता गेले व श्री.सुशांत बावनगडे यांची भेट घेतली असता श्री. बावनगडे यांनी तक्रारदार यांना म्हटले की, “मला तुमच्या क्लाईटंचे अर्ज प्राप्त झाले आहे त्यांचे कामाची पाहणी करुन देतो त्यासाठी काय आहे ते पाहुन घे ”असे म्हटले त्यावर मी त्यांना माझे चार फाईल असुन ऑर्डर काढुन दया असे म्हटले असता त्यांनी मला म्हटले की,माझे चार कामाचे प्रत्येकी १,०००/—रु प्रमाणे एकुण ४,०००/—रु दयावे लागेल अशी लाचेची मागणी केली. अशी तक्रार दिली

सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक ०८/०४/२०२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे यांनी तक्रारदार यांच्या एकुण ०४ ग्राहकांच्या ग्राहकांच्या सोलर मिटर रिलीज ऑर्डर काढण्याकरीता तक्रारदार यांचेकडे ०४ ग्राहकांचे प्रत्येकी १,०००/—रु प्रमाणे एकुण ४,०००/—रु लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आयोजित सापळा कारवाई दरम्यान आलोसे सहाय्यक अभियंता,श्री.सुशांत हरीदास बावनगडे यांनी तक्रारदार यांचेकडून ४,०००/—रु रुपये लाच स्विकारले वरुन आलोसे सहाय्यक अभियंता, श्री.सुशांत हरीदास बावनगडे,म.रा.वि.वि.कं.मर्या धारणी कार्यालय यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द पो.स्टे.धारणी अमरावती ग्रामीण येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती परिक्षेत्र, अमरावती चे पोलीस अधीक्षक श्री.बापू बांगर, अपर पोलीस अधीक्षक श्री.सचिंद्र शिंदे, पोलीस उपअधीक्षक श्री.सुनिल किनगे यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि,श्रीमती योगीता ठाकरे पो.नि..चित्रा मेसरे, पो.शि.शैलेश कडू, आशिष जांभोळे, चालक पो.उ.नि. सतीश किटूकले, यांनी यशस्वीरित्या पार पाडली.

अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकिय अधिकारी/कर्मचारी यांनी किंवा त्यांच्या वतीने खाजगी इसमाने त्यांचे कोणतेही शासकिय काम करुन देण्यासाठी लाचेची मागणी केल्यास तात्काळ अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :—

१)श्री.बापू बांगर, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परिक्षेत्र,अमरावती मो.नं.९०११३२३४२६

२) श्री.सचिंद्र शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परिक्षेत्र, अमरावती मो.नं.९७६४२१०४८५

३) श्री.सुनिल किनगे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. अमरावती परिक्षेत्र, अमरावती मो.नं.९८२३१११११५५, ७५१७५७१०६४

**कार्यालयाचा पत्ता** :— अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती, ललीत सेंटर परांजपे कॉलनी, अमरावती

टोल फ्री कमांक :— १०६४, दुरध्वनी कमांक ०७२१—२५५३०५५

(पोलीस उप-अधीक्षक कार्यालय ... stamp)

योगिता जनार्दन ठाकरे
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती